महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २९ /२०२३

दि. १७/०२/२०२३

**–: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–**

**संदर्भ** :– जा.क्र. पोउपआ/वावि/रस्ता दुरूस्ती परवानगी/५१५/२०२३, दि. १०/०२/२०२३

*****

**ज्याअर्थी,** कापुरबावडी वाहतूक उप विभागचे हद्दीत दिनांक १८/०२/२०२३ ते दिनांक १९/०२/२०२३ रोजीपावेतो श्री. नंदीबाबा मित्र मंडळ तर्फे **'महाशिवरात्री'** उत्सव साजरा करण्यात येणार आहे. उत्सवाचे दरम्यान भाविकांची मोठया प्रमाणात गर्दी होत असल्याने सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी**, मी **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) ठाणे घोडबंदर वाहिनीवरील माजीवडा नाका कडून नळपाडा मार्गे कोलशेत कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **नळपाडा सिग्नल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने कापूरबावडी सर्कल येथून तत्वज्ञान सिग्नल मार्गे आर मॉल अथवा ब्रम्हांड मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) माजीवडा मानपाडा प्रभाग समिती समोरून कोलशेतकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **माजीवडा मानपाडा प्रभाग समिती समोर 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने कापूरबावडी सर्कल येथून उजवे वळण घेवून तत्वज्ञान सिग्नल मार्गे ब्रम्हांड अथवा आर मॉल मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) कोलशेतकडून कापूरबावडी सर्कल तसेच माजीवडा मानपाडा प्रभाग समितीकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **ढोकाळी सिग्नल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने ढोकाळी सिग्नल येथून उजवे वळण घेवून मनोरमानगर मार्गे अथवा लोढा अमाराकडून लोढा बिझनेस डिस्ट्रीक समोरून ब्रम्हांड मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदरची अधिसुचना दिनांक १८/०२/२०२३ रोजी १७:०० ते रात्रौ २२:०० वाजेपावेतो आणि दिनांक १९/०२/२०२३ रोजी रोजी १७:०० ते रात्रौ २२:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( डॉ. विनयकुमार मे. राठोड )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे

२/– सदरची अधिसुचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**

– मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

– मा. जिल्हाधिकारी, ठाणे
– मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
– मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.
– प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
– पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५ वागळे इस्टेट, ठाणे.
– पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे.
– परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालीका, ठाणे.
– विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे.
– नियंत्रण कक्ष, ठाणे शहर
– ठाणे पोलीस पत्रक

**प्रत** :– समन्वय अधिकारी ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,**
स.पो.आ. ठाणे वाहतूक विभाग,/पोनि कापुरबावडी, वागळे, राबोडी वाहतूक उप विभाग.
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिका–यांकडून आवश्यक सुचना फलके लावून घ्यावीत.